

# अंकुर अक्षरांचे..

## भाग तिसरा

*मनातल्या भावनांना अंकुर फुटावेत*
*अन त्या अंकुरांची अक्षरं उमटावीत*
*अक्षरांचे श्वास होता होता*
*अंकुरल्या भावनांना पानं फुटावीत*
*अंकुरपानातून उमटावी एक कळी*
*प्रतिमेचे हुंकार भरता तिची असंख्य फुलं व्हावीत*

*ई-पुस्तकाचे नावः अंकुर अक्षरांचे. (भाग तिसरा)*

*संकल्पनाः "मराठी कविता" संचालक.*

*रसग्रहणः रंजन कंधारकर*

*मांडणी आणि सजावटः संहिता हिस्वनकर.*

*प्रकाशकः ई-साहित्य प्रतिष्ठान*

आभार.

"मराठी कविता" ने आयोजित केलेल्या "अक्षर-अंकुर महोत्सव २०१२" ला आलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल सर्व सहभागी कवी-कवयित्रींचे हार्दिक आभार. अंकुर अक्षरांचे ही पुस्तक मालिका त्यातीलच निवडक कवितांची बनली आहे.

©या पुस्तकातील कवितांचे सर्व हक्क त्या त्या कवींच्या स्वाधीन. या पुस्तकातील कुठल्याही कवितेचा वापर अथवा पुनर्मुद्रण करण्याआधी संबंधीत कवीची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# तिसऱ्या अंकाची प्रस्तावना

रसिकहो, अक्षर-अंकुर महोत्सवाचे पहिले दोन अंक तयार करणं आणि त्या अनुषंगाने काव्यवाचन हा एक अवर्णनीय अनुभव होता. आपल्या हाती हिऱ्यांचा हार असावा आणि आपण त्यातल्या एकेका हीऱ्याचं मोल जाणून पुन्हा पुन्हा थक्क होत रहावं असं काहिसं घडत आहे. पहिल्या दोन अंकांना मिळालेला प्रतिसाद आणि पाठीवर पडलेली कौतुकाची थाप खूप खूप बोलून जाते जे शब्दात मांडता येत नाही. "मराठी कविता" ला खूप पुढं जायचं आहे आणि खूप काही मिळवायचं आहे याचीच ही नांदी! आणि या लांबच्या प्रवासात रसिकांची साथ अन आशीर्वाद लाभत आहेत हे सौभाग्य.

"अंकुर अक्षरांचे" च्या प्रत्येक भागात आम्ही आधीच्या भागाला मिळालेल्या प्रतिसाद-सूचनांनुसार बदल करत जात आहोत. आमच्यासाठी आमचे सहभागी सर्वच कवीजन अमूल्य आहेत आणि त्यांच्या कविता या अंकामध्ये वाचणं हा त्यांच्यासाठी एक आनंददायी अनुभव असावा हे आमचं त्यामागचं उद्दिष्ट आहे.

अंकुर अक्षरांचे च्या या अंकात दोन लक्षात येण्यासारख्या गोष्टी आहेत. त्यातली पहिली म्हणजे एकाच कवि-कवयित्रीच्या एकापेक्षा जास्त कवितांचा अंतर्भाव. महोत्सवाला आलेल्या शेकडो कवितांमधून रसग्रहण प्रक्रीयेदरम्यान कवितांचं वर्गिकरण करण्यात आलं ते त्यांच्या रचना, शब्दांचा वापर, नेटकेपणा आणि नेमकेपणा या निकषांवर. त्या वर्गिकरणान्वये ज्या कविता एका दर्जाच्या होत्या त्या एका अंकात घेतल्या गेल्या. योगायोगाने त्यातील काही एकाच कवीच्या आहेत. प्रत्येक कवी कडून जास्तीत जास्त ५ कविता स्वीकारल्या गेल्या असल्याने हेही साहजीक होय.

दुसरी गोष्ट अंकाच्या मांडणी संदर्भातील. अंकाची रचना करताना, यावेळी कवी मित्रांना विचारांच्या केंद्रभागी ठेवलं आहे. प्रत्येक रचनेच्या नावानंतर लगेचच कवी-कवयित्री चे नाव घेण्याचा निर्णय हा त्या त्या कवींना त्यांच्या सुंदर रचनांबद्दल धन्यवाद देण्याच्या भावनेतून घेण्यात आला आहे. कवि-कवयित्री आपल्या रचनांना मनामध्ये एक अढळ स्थान देतात. तसंच त्यांच्या नावांना देखील यावेळी एक उच्चस्थान देण्याचा प्रयत्न केला आहे.

मागच्या अंकात नमूद केल्याप्रमाणे कवितांची संख्या, मनोगतं आणि आशीर्वाद हे तसेच ठेवले आहेत. डिझाईन मध्ये बदल केले आहेत. आणि अंकाला परिपूर्ण बनवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. या प्रयत्नांचं हे फलित आपल्याला कसं वाटलं हे नक्की कळवा.

संहिता हिस्वनकर

samhita.hiswankar@gmail.com

# रसग्राहिकेचा परिचय:

रंजन कंधारकर यांची खरी ओळख म्हणजे कविताच त्यांच्या अनेक कविता आजवर विविध वृत्तपत्रे, दिवाळीअंक तसेच नियतकालिकांमधून प्रकाशित झालेल्या आहेत. त्यांचा “स्वधा” हा काव्यसंग्रह प्रकाशीत झाला असून त्याला महाराष्ट्र राज्य शासनाच्या “बहिणाबाई चौधरी” पुरस्कारासहित तब्बल २१ पुरस्कार प्राप्त आहेत.

कविवर्य लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या “गोकुळवाटा” या काव्यसंग्रहातिल कवितांच्या अभिवाचनात त्यांचा सहभाग असतो. याशिवायही महाराष्ट्र व गोमांतकात अनेक ठिकाणी त्यांचे काव्यवाचनाचे कार्यक्रम होतात. 'आनंदयात्रा' या बा.भ. बोरकरांच्या व 'रसयात्रा' या कुसुमाग्रजांच्या काव्यवाचन समारंभात त्या सहभागी असतात.

आकाशवाणीवरील कविसंमेलने, पथनाट्य वाचन, मुलाखत इत्यादी कार्यक्रमांत त्या सहभागी होतात. याशिवाय शालेय-महाविद्यालयीन कथा व काव्यलेखन स्पर्धांमध्ये अनेक वेळा त्या परिक्षक म्हणून काम पाहतात.

रंजनताई सध्या 'मधुगंध' काव्यमंडळाच्या कोषाध्यक्षा तसेच 'अक्षरसूक्त' काव्यमंडळाच्या सचिव म्हणून पदभार सांभाळतात. आपल्या शब्दांतून आणि मार्गदर्शनातून त्यांची साहित्यसेवा अविरत सुरू असते. त्यांचा “भूर्जपत्र” हा आगामी काव्यसंग्रह लवकरच आपल्याला पहायला मिळेल.

# रसग्राहिकेचे मनोगत:

अंकुर अक्षरांचे मालिकेतील अक्षरांचे धनी असलेल्या सर्वांचं अभिनंदन !!
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

अंकुरण हा सृष्टीचा नियम आहे मग ते .अ पानाचं अंकुरण ! पाना पानांचं अंकुरण असो वा मना मनाच जमिनीशी नातं ठेऊन असत तरमनाचं भावनेशी !!
असे फुटवे अंकुर अक्षरांचे या मालिकेत आपल्याच मस्तीत उगवतांना दिसतात काही कोवळे ., काही गार हिरवे , काही परिपक्व तर काही सुकलेलेही कवितेच्या रुपात येणारे हे अंकुर एकंदरीतच मनाला हिरवं करुन . काही ठिकाण तर केवळ पाचूची आहेत यातली जातातती , रुद्रविणा , पाउलवाट , माफीनामा , एकरूप , बिंदू , जन्म कवितेचा , मन , वसंत ऋतू अशी काही नावं नमुन्या दाखल देता येतील या ठिकाणी मन रमलं नाही . . तरच नवल
काही नाजूक वेलींना मात्र अजुन जराश्या आधाराची गरज वाटते भारंभार वाढल .ेली शब्धांची पानं ह्या वेलींना उपजत जड करतात नीटस . आणि मग हिरवाईचा तोल गेलेला दिसतो ., नेमकी शब्धरचना ; रचना करता करता पूर्ण कवितेलाच दिलेला सुबक आकार , त्याच त्या अर्थाची कडवी करुन बांडगुळ निर्माण करण्याचा टाळलेला मोह या अगदी छोट्या छोट्या गोष्टी कवितेला उंची देण्याच काम करतात जसं पिवळी पान ., सुकलेल्या फांद्या , शिळी फुलं , आजू बाजूला वाढलेलं तण ह्या गोष्टी काढून टाकल्या की झाड अधिकच मोह घालत , बस , तसच !
अंकुर अक्षरांचे मालिकेतील या कविता रूपातील अंकुरांचा हा महोत्सव मनापासून मनापर्यंत सेतू बांधण्याचे काम मन ही . अंकुरण्याची त्यांची धून विलक्षण आहे . पूर्वक करत आलेला दिसतो: धून, धुनी सारखी चिरकाल तेवत रहो !! ही सदिच्छा .

संबंधित सर्वांचे आभार !

रंजन !! आतून .....
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

# कविवर्य फ. मु. शिंदे सरांचे अक्षर अंकुर महोत्सवाला लाभलेले आशीर्वाद:

महोत्सव हा नवा मीडियाचाच शब्द आहे. अक्षरात अंकुरणारं आकाश असेल तर महोत्सव चंद्र पावतो. कवींचं आकाश चंद्राचं. कवींचं आणि पुन्हा पुनवेचंही. म्हणून महोत्सव आकाश आणि मातीच्या पुनवेचा चंद्रोत्सवही असतो. 'अक्षर अंकुर महोत्सव २०१२' या उपक्रमात त्याची भूमिकाही आहेच. मुख्य म्हणजे महोत्सवातली उत्कटता.

'अंकुर अक्षरांचे' ही पुस्तक मालिका त्याची म्हणजे महोत्सवाची ई-आवृत्ती आहे. 'ई' हा 'आ'चा प्रत्यय आहे की 'आई'त 'आकाश आणि ईश्वर' हा शब्दांचेही अर्थ पावतो. मराठी कविता संचालक मंडळाने अक्षरांना अंकुरित करण्याचा आत्मविश्वास दिला, हेच मालिकेचं मोल आहे!

फ. मु. शिंदे

# मैत्रिण

अर्चना रानडे.

जाणारा काळ जात असतो,

सोबत, आपल्यालाही नेत असतो,

आपल्याला जरी असतं रेंगाळायचं,

शैशावाच्या झुल्यावर पुन्हा एकवार झुलायचं;

दिसतं गाभुळलेल्या चिंचांनी लगडलेलं झाड,

मैत्रिण म्हणते '' मार दगड, अगं पाड",

मी आजूबाजूला बघत राहते,

दगड कुठे मिळतो का ते शोधते,

बाजूला असतं बरंच काही,

पण तो दगड कुठेही दिसत नाही;

कॅन्टीनच्या कट्ट्यावर जाऊन,

वडापाव झणझणीत खाऊन,

मला एक कटिंग मारायचं असतं,

त्या तरुणाईत पुन्हा हरवायचं असतं,

स्टेशनवर मस्त गर्दी दिसते,

आता मैत्रिण स्केचिंगची आठवण करते,

पर्स मधल्या गदारोळात शोधात राहते,

पण पेन्सील स्केचबुकच तेवढे त्यात नसते;

चिऊकाऊच्या चित्राचं दुपटं- इवलालं,

त्यावर निजलेलं असतं माझं तान्हुलं,

निजवीत असते गाऊन अंगाई,

झोपाळलेल्या डोळ्यांनी ही आई,

मला पुन्हा अंगाई गायची असते

मैत्रिण मात्र आता काही म्हणत नसते,

एव्हाना काळाच्या ओघात तीच हरवलेली असते;

नेटवर, फेसबुकवर, तिलाच तर शोधत्येय आजवर,

मैत्रिण जरी सापडली ना पुन्हा,

तरी जीव येईल त्या आठवणींना,

दोघी मिळून काळाचं हे गणित सोडवू,

तास चुकवायचो ना, तसा मिळून काळाचा डोळा चुकवू....

¤¤¤¤

# तू आधार आहेस

पृथ्वीतनय

कसा आला हा पाऊस सारे घेऊन गेला ,
मला तेवढा फक्त ठेऊन गेला .
सगळ्या वस्तू वाहिल्या माझं घरही वाहिलं,
आई. बाबांनाही मी वाहून जाताना पाहिलं-

वाटले मला जावे आपणही वाहून,
काय करावे शेवटी एकटे राहून ?
पण, एक शब्द मी ऐकिला तो लढ असा होता,
हिमतीने. नव्याने पुन्हा जग असा होता-

मनात राहिला तो शब्द मी ताडकन उठलो ,
गालावरील अश्रू पुशीत वाटेने धावत सुटलो.
माझी धावती पाऊले देवाच्या मंदिरी थांबली,
म्हणालो पाठीशी राहा देवा माझी सोबत संपली .

थोडी दया तू दाखव मला एकट्याला पाहुन,
बघ सारे गेले रे माझे त्या पावसात वाहून.
फक्त थोडी हिमत तू दे धीर धरलाय मी ,
पुन्हा उभं करील घर पाया घातलाय मी .

हे दुःख तर सहज मी निभाऊन नेईन ,
एकटा पडलोय तर एकटा जगून घेईन .
फक्त आई बापाचे प्रेम मी तुला मागतोय-,
माफ कर, न विचारता तुला बाबा म्हणतोय .

फक्त माया तू लाव बाकी मी पाहून घेतो ,
माझ्या हिमतीवरती हे जीवन जगून घेतो .
तू असलास कि कसं मला एकट वाटणार नाही ,
आई . मनी दाटणार नाही बाबा गेल्याचं दुःख-

मग तुझा पाठीवरचा हात बळ छातीला देईल ,
मी न राहील एकटा मुठीत मातीला घेईल .
हि माझ्या जीवनाची लढाई ज्यात तू आधार आहेस ,
तुच माझा होकार , तूच निर्धार आहेस

¤¤¤¤¤¤

# बांडगुळ

संदेश बागवे

सावलीच्या नादात
राखलेला तो बांडगुळ निघाला

रान सारं हतबल
निष्प्रभ गुरफटलेलं
की पुरतं आहारी त्याच्या?

काही झाडं वेढलेली
त्यातला मी एक
पण वेळ कुणालाय
फसलेल्या गाठी सोडवायला?

आता सोडलेल्या गाठी
पाश बनतायत
पण आम्ही मात्र केविलवाणे

एकाच समाधानात की मूक आक्रोश करीत?
आमच्याच रक्ताच्या
काही फांद्या त्याला चिटकून
सूर पारंब्या खेळतायत
.................

# फिबोनाकी कविता

## शुभदा गद्रे

फिबोनाकी (Fibonacci) सिक्वेन्स हा एक गणितातला आकड्यांचा क्रम आहे. यात पहिली आणि दुसरी संख्या १, १ अशी असते. आणि त्यापुढील संख्या मागील दोन संख्यांच्या बेरजेइतक्या असतात. म्हणजेच १,१,(१+१=२),(२+१=३),(३+२=५), ------- असा हा संख्याक्रम असतो. फिबोनाकी (Fibonacci) कविता ही एक नवी संकल्पना आहे. इंग्रजीत या प्रकाराला फीब (Fib.) कविता म्हणतात. या प्रकारात कवितेच्या प्रत्येक ओळीत फिबोनाकी मालेप्रमाणे शब्द असतात. कविता चढत्या क्रमाच्या कुठल्याही ओळीत संपू शकते किंवा चढत्या श्रेणीनंतर उलट्या क्रमाने कमी कमी शब्दांची होत एका शब्दावर संपते.

व्रत

१ विवाह

१ हे

२ व्रत आहे,

३ पती, पत्नी दोघांसाठीचं.

५ ही आण आहे जीवापलीकडे जपण्याची.

८ कोणी एकानेच खेळण्याचा हा काही पेशन्सचा डाव नाही.

१३ हा बुद्धीब्ळाचा खेळही नाही की जो खेळतात तर दोघं, पण
केवळ एकमेकांना हरविण्यासाठीच.

२१ म्हटलं तर हाही एक खेळच आहे ज्यात केवळ देतच रहायचं असतं दोघांनीही
एकमेकांना, आणि स्वतःला निछावर करायचं असतं परस्परांसाठी आणि परस्परांवर.

१३ कुणी किती दिलं आणि कुणाला किती मिळालं याचा हिशेब नसतो ठेवायचा या खेळात.

८ हे एक नृत्य असतं एकमेकांचे तोल सांभाळत लय साधलेलं.

५ सोपं नसतं निभावणं न उततामातता ;

३ श्वासाश्वासात विश्वास सांभाळत,

२ जपून ठेवणं

१ प्रीतिचं

१ मोरपीस.

¤¤¤¤¤

# नाल

शुभदा गद्रे

होते जमले सगळे, माझे करायला भले
माझ्या मनाच्या अश्वाला, नाल ठोकाया चांगले
आयुष्याच्या वाटेवर' म्हणे 'काटे अगणीत
खळग्यांचा, पाषाणांचा तर लागेनाच अंत.
माझा अश्व अननुभवी, 'म्हणे ' होईल बंबाळ
फरफट सावराया कसे आणेल ते बळ?
एवढ्याशाही उन्हाने फुले जाती कोमेजून
परी पाषाण अभंग उभे उन्हापावसातून
'म्हणे ' कोमल मनाला ठोका पाषाणाचे नाल
मग सुखाने आचर, उभ्या आयुष्याची चाल
धाव धाव मी धावते, या हितचिंतकांपासून
कुणी सोडवा सोडवा, मला सोसेना हा ताण
नकॊ नको नको मला ती हो पाषाणकवचे
नाही बधीर मजला, माझे मन करायाचे.
तम तांबडा सोशीन, वाट पहाता तेजाची
स्वर कर्कश गिळीन, स्वर्गसंगीताच्यासाठी
सत्व, रज आणि तम, सारे सारे हवे मला
भोगू बरे वाईटही, नको झापड मनाला .
माझा अश्व हा मनाचा, होऊ देत हो बंबाळ
तरीच ते उमजेल मला जीवन विशाळ
दोन श्वासांचे आयुष्य, पुरे मला प्राजक्ताचे
नको सुखी चिरायुष्य, मज पाषाणखंडांचे.

# परतल्यावर

शुभदा गद्रे

*त्याला देतांना निरोप, होती घातलेली अट*
*हात रिकामे घेऊन नाही यायचे परत*
*काहीच ना मिळविता जर माघारी तो आला,*
*दारे बंद असतील घर गवसेल ना त्याला.*

*खूप झाला धनवंत, मनी ठरविले त्याने*
*घरी परत जातांना, भरू पेटारे धनाने*
*सारे राहिले मनात, काही नाही नेता आले*
*रिक्तहस्त गेल्यामुळे त्याला परतावे लागले.*

*सत्ता कमावली खूप, आल्यावर परतून*
*आता जातांना मागुती, नेऊ म्हणे सिंहासन*
*ठोठावता दारावर येई त्याला अवधान*
*आहे रिकामेच हात, कुठे गेले सिहांसन?*

*खूपखूप रागावून त्याने ठरविले मनी*
*जर रिकामे जायाचे, घ्यावे इथेच भोगुनी*
*खूप घेऊन उपभोग गेला रिकाम्याच हाती*
*होते माहीत मनाला आहे यायचे मागुती*

*चुकूनच कुणासाठी, आधाराचा हात दिला*
*दुःखीकष्टी गरजू तो, आसवातून हसला*
*पुन्हापुन्हा पहावेसे वाटू लागले ते हसे*
*हात देण्या मदतीचा, मग लागलेच पिसे*

*दधिचीच्या हाडांपरी दिले सारे उधळोनी*
*आणि माघारी जातांना वेध परतीचे मनी*
*यावे परतोनी मागुती पुन्हा पुसायाला आसू*
*दुःखीकष्टी मुखांवरी  फुलवाया गोड हसू*

*मातापित्यांनी स्वागत, केले मिठीत घेऊन*
*ला परतोनी बाळ, खूप काहिसे घेऊन*
*भांबावून मग त्याने भोवताली निरखिले*
*किती निश्वास तृप्तीचे होते सोबतीने आले*

¤¤¤¤¤

# आकाशाचं ताट

सतीश कर्णिक

दोन्ही तान्ह्याना बाई गं
भुकेलेच जोजावले
लगी मनाच्या भांड्यात
दोन सूर्वे उग्विवले
सुर्वे पाहोन की माहे
सारे भान हरपले
माह्या भाकरीच्या तव्या
दोन तारे करपले
चमचमीत वठली चांदण्यांची गं उसळ
चटणी-आकाशाच्या अंधाराची खर्डा खट्याळ
मीन राशीची सुरमई
तळली पिठूर लावून
पूर्वे फुटलं तांबडं
त्याचं केलं कालवन
सांज रंगांची जिलेबी
केसरात गं घोळली
चव घेता घेता कशी
माही जीभ ती पोळली
असं भरलं भरलं
माजं आकाशाचं ताट
पंचपक्वान खाताना
माही झाली पुरेवाट
हात धुता धुता माझा घरधनी की हो आला
मी म्हनाले की बाबा तुहे उसीर का जाला
आकाशाचे ताटातले अन्न सपले हे सारे
तुह्यासाठी उरले ते दोन करपले तारे
जसं संपलं सपान आन उगडले डोळे
तशे रिकाम्या पोटावे दोन आसू ओगळले

¤¤¤¤¤

# तुझी भेट व्हावी

केदार

*किती खोल गेला तुझा वार दाही ,*
*असा तोल गेलापुन्हा स्थैर्य नाही ,*
*जरी काळ वाटेतसा थांबलेला ,*
*पिसाटून वारादिशा भांबलेला ,*

*दिठी बावरीशीजराशी स्थिरावी ,*
*फिरूनी नव्यानेतुझी भेट व्हावी ,*

*किती पावसाळेसरींनी बुडाले ,*
*जणू वाफ तैसेउन्हाळे उडाले ,*
*तरी दाह ओलातुझा खेटलेला ,*
*अजूनी विझेनाउरी पेटलेला ,*

*तृषा अश्वथामीजराशी क्षमावी ,*
*फिरूनी नव्यानेतुझी भेट व्हावी ,*

*किती काळ गेलासुचेनाच काही ,*
*किती बांध घालूतरी ठेच वाही ,*
*जुनी ओळ ओठीपुन्हा साचलेली ,*
*कितीदा नव्यानेअसे वाचलेली ,*

*तुझी ओढगीतेप्रवाही वहावी ,*
*फिरूनी नव्यानेतुझी भेट व्हावी ,*

*नदी सागरालाभरावी खळाळी ,*
*नभी चांदण्यांना,नव्याची झळाळी ,*
*तुझे मंद हासूमनी कोरलेले ,*
*किती श्वास वेडेतुझे चोरलेले ,*

*तुझ्या स्पंदनाने,क्षितीजे झुलावी ,*
*फिरूनी नव्याने तुझी ,भेट व्हावी*

¤¤¤¤¤

# हे साध्वी

विलास गावडे

स्पर्श केलास कैकदा
माझ्या पायांना
तुझा श्रीराम समजून

नंतर वाटले तुला
तो राम नसून
रावण होता

अजूनही तुझा
तोच समज असेल
तर हे साध्वी!
जाळून टाक मला
टाक करुन
बेचिराख मला
तुझ्या साध्वीपणाच्या
अमरत्वासाठी

¤¤¤¤¤

# पावसाचं गणित

मोहसीन डांगे

*हजारो प्रश्न आहेत मनी, पण उत्तर काही मिळत नाही*
*या पावसाचं मला गणित काही कळत नाही*

*काहीही म्हणा पण*
*हा पाऊस देखील या देशातल्या नेत्यांसारखाच वागतोय*
*सर्वसामान्यांच्या गरजांना हा कितिसा हो जागतोय?*
*इतरत्र धो धो पडणारा हा पाऊस*
*आमच्याकडे किंचितसाही वळत नाही*
*या पावसाचं मला गणित काही कळत नाही*

*देवच जाणो कसली आहे ही शिक्षा*
*चार थेंब पाण्यासाठी आणखी किती प्रतिक्षा*
*म्हाताऱ्या डोळ्यांची आस संपत आली*
*पण आभाळ काही गळत नाही*
*या पावसाचं मला गणित काही कळत नाही*

*जीवनमरणाचा हा प्रश्न ढगांनी दडवलाय*
*गरिबांनी आत्महत्या करून हाही प्रश्न सोडवलाय*
*अश्रूत भिजवलेला कापूस आता पेटवला तरी जळत नाही*
*या पावसाचं मला गणित काही कळत नाही*

¤¤¤¤¤

# मुहूर्त

वंदना धर्माधिकारी

आज मुहूर्त वेळेला
ठेवुनी विडा सुपारीला

लग्नाचं सांगितलं देवा गणेशाला
साकडं घातलं घरच्या देवीला
आनंद उत्साह वाढला
तोरण बांधलं दाराला
निर्विघ्न होऊ दे कार्य अमुचे
आशिष दे तू आम्हाला

आज मुहूर्त वेळेला
ठेवुनी विडा सुपारीला

घरोघरीच्या पाच सुवासिनी
लगबग करिती साऱ्याजणी
आईबाबा सासूसासरे
इथे कशाला नाही कमी
प्रथम वंदुनी गणरायाला
हळदीकुंकू देवीला
उखाणे घेता घेता
हळकुंडे मुहूर्ताला..

मुहूर्त करुनी गव्हले सांडले
मस्करी हासणे लाजणे

आज मुहुर्त वेळेला
ठेवुनी विडा सुपारीला

आज या लग्नतिथीला
घाणा त्यांनी भरला
स्वस्तिकाचे पूजन झाले
सुपलीत गहू कांडले
नवरीला हळद लावली
नवऱ्याला उष्टी हळद माखली
मंडपी हळद खेळली
लग्न तयारी जाहली

आज मुहूर्त वेळेला
ठेवुनी विडा सुपारीला
¤¤¤¤¤

# कुंडली ! कुंडली !! कुंडली !!!

वंदना धर्माधिकारी

संगणाकाने कमाल केली, जन्मवेळ देता जादू झाली
गणिती आकडेमोड उरकली, समोर 'जन्मकुंडली' प्रकटली

शनि राहू केतू आले, बुध नेपच्युन प्लुटो बसले
गुरु, मंगळ, हर्षल, चंद्र शुक्रासह होते 'कुंडली'

अक्षांश आणि रेखांश विश्वात कोठे मिळतात?
त्यास काय म्हणतात? नाव सांगे कुंडली

पत्रिकेच्या नाना तऱ्हा, नारायणी आणि पाश्चात्य
सायन आणिक निरयन, सर्वच दावी कुंडली

नक्षत्र, रास, गण, गोत्र, पत्रिकेत एकत्र पाहिली
दोघांची युती पाठीशी शशी, सांगड घाली कुंडली

प्रत्येक राशीला साडेसाती, पाच सरली अडीच उरली
शुभांक अन खडे द्विली, प्रचिती दावे कुंडली

एक पानी, शंभर पानी, भूतभविष्याची रेखाटणी
क्षणात सुबक मांडणी, छापून देई कुंडली

अभ्यास करून परिक्षा दिली, मार्कलिस्ट बघता भोवळ आली
अपयशाने भरली झोळी, काय करू? सांगे कुंडली!

दोघांची मने जुळली, परी पत्रिका आड आली
जिवाची घालमेल झाली तेव्हा मार्ग दावी कुंडली

नोकरीवरती गदा आली धंद्याची पुरी वाट लागली
घरादाराला कळा आली, उपाय सुचवी कुंडली!

ही व्यवसायाची हमी, पैशाला ना पडे कमी
घ्या संगणकी बसवुनी, तुम्हा श्रीमंत बनवी कुंडली!

कुंडली व्यवसाय काम, कष्ट थोडे योग्य दाम
वेळेचे नियोजन छान, कुंडाली ! कुंडली !! कुंडली !!!

¤¤¤¤¤

# वसंतऋतू

वंदना धर्माधिकारी

संतांशी जाई शरण त्यसी म्हणती साधक
निसर्गसौंदर्याचे आम्ही सारे उपासक
ऋतू सहा पण तू सर्वांची पहिली पसंत
'वसुंधरेचा संत' म्हणून नाम तुझे वसंत

जीर्णपर्ण ते झडले होते फुलते नवपल्लवी
गेलेल्याला जाऊ द्यावे, चैतन्याची कास हवी
या धरणीचे रूप सजविता देवा नसे उसंत
'वसुंधरेचा संत' म्हणून नाम तुझे वसंत

होत्या काड्या बहरुनी आला झाला डोलारा
ग्रीष्मातील पांथस्थाचा क्षणिक तो निवारा
येणाऱ्याला देत जावे मिटावी त्याची खंत
'वसुंधरेचा संत' म्हणून नाम तुझे वसंत

येतो तो जाईल नक्की नियतीचा हा धडा
नकोस मागे वळून पाहू निश्चल हो तू खडा
रोग्यांना तू औषध देशी मारी व्याधी अनंत
'वसुंधरेचा संत' म्हणून नाम तुझे वसंत

आंब्यालाही मोहर आला मोगऱ्याला कळी
दुःख सोडून फुलून येते हास्य चंपाकळी
यथेच्छ जेवून ढेकर देती तृप्त सारे पंत
'वसुंधरेचा संत' म्हणून नाम तुझे वसंत

संतासंगे गुरूच्या द्वारी उद्धरला वेडा
वसंताच्या आगमनाने निसर्ग पुनश्च खडा
कालचक्रही हेच असावे, जुळते तंतोतंत
'वसुंधरेचा संत' म्हणून नाम तुझे वसंत

¤¤¤¤¤

# रोज त्या दोघी स्टेशनवर भेटायच्या

रुपेश सावंत

*गर्दीत नेहमी घाईत दिसायच्या*
*नेहमी एकमेकींना शोधत फिरायच्या*
*नजर भिडली की हायसं हसायच्या*
*रोज त्या दोघी स्टेशनवर भेटायच्या..*

*एक नुकतीच त्यातली लग्न झालेली*
*तर दुसरीनं आत्ताच पन्नाशी ओलांडलेली*
*मैत्रिणी नक्कीच नव्हत्या अन*
*आई-मुलीची ना खूण पटलेली*
*ओलावा पर तोच त्यांच्या नात्याचा*
*रोज त्या दोघी स्टेशन्वर भेटायच्या*

*कधी पिशवीतून आणलेले बेसनाचे लाडू*
*कधी स्टीलच्या डब्यातली पुरणपोळी*
*कधी गरम गरम केलेला गाजराचा हलवा*
*तर कधी कागदात नुसतीच लिंबाची गोळी*
*बाकावर एकमेकींना मग प्रेमाने भरवायच्या*
*रोज त्या दोघी स्टेशनवर भेटायच्या*

*आज ती स्टेशनवर एकटीच दिसली*
*रोजच्या बाकावर जाऊन शांत बसली*
*ना शोधाशोध ना घाई कसली*
*लोकलमधेही कशी निमूट चढली*
*आज नाही सोबत जशा नेहमी असायच्या*
*रोज त्या दोघी स्टेशनवर भेटायच्या*

*बरेच दिवस रोज मग हाच प्रकार*
*मनात माझ्या तेव्हा शंका हजार*
*न राहवून शेवटी मी विचारलं तिला*
*तिचं ते उत्तर आणि मी लाचार*
*"माझ्या माहेरी त्या शेजारी रहायच्या"*
*"आईनं दिलेलं आणून मला द्यायच्या"*
*"आता कधीच नाही तुम्हाला दिसणार त्या"*
*"आता कधीच नाही स्टेशनवर येणार त्या"*
*तिचे ते बोल हुंदक्यात विरले*
*डोळ्याकडे जाता पदर सारे मला कळले*
*नात्याविण नात्याचे गुज आज कळले*
*आता कधीच दिसणार नाही त्या, जशा नेहमी दिसायच्या*
*रोज त्या दोघी तेव्हा स्टेशमवर भेटायच्या...*

¤¤¤¤¤

# बारा लाख वाचकांसाठी ई चळवळ

तीन वर्षापूर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना दिडशेहून अधिक पुस्तके विनामुल्य दिली. मोरया , मीरा, कृष्ण, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वामी विवेकानंद, विंदा करंदीकर, ना. धो. महानोर, ग्रेस, नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. सुमारे ४०० नविन साहित्यिकांना लोकांसमोर आणले. इंटरनेट्वर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरीरीने पुढे नेली.

प्रेम आणि सौंदर्याबरोबरच आत्महत्या आणि दहशतवाद अशा विषयांवरचं साहित्य मांडलं . विनोदाला वाहिलेलं ई-स्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीतासाठी संगीत कानसेनचे वर्ग चालवले.

नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातील किल्ल्यांची माहिती देणा-या पुस्तिका "दुर्ग दुर्गट भारी" द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगातल्या मराठी मंडळींना उभारी दिली. लाखभर रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामुल्य पोचवण्याची आमची परंपराआम्ही अधिक जोमाने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहूदे. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फक्त लाखभर लोकांपर्यंतच मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य साहित्य पोचलचं पाहिजे असं नाही वाटत आपल्याला ? आणि त्यासाठी काही फार करायची गरज नाही. आपल्या ओळखीच्या १२ लोकांची, १२ मराठी लोकांची ईमेल आयडी द्याल?? जास्त दिलीत तरी हरकत नाही पण निदान १२ लोकांची ईमेल आयडी पाठवा. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी १२ आयडी पाठवले तर लाखाचे १२ लाख व्हायला कितीसा वेळ लागणार ? बारा लोकांची मेल आयडी पाठवणा-या वाचकांना आम्ही ई साहित्य प्रतिष्ठानचे पाठीराखे म्हणून मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील

*प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सुचना मागवत राहू.* मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल.

***तर होणार ना ई-साहित्य प्रतिष्ठानचे पाठीराखे ??***

***फक्त आपल्या खास मराठी मित्र, नातेवाईकांच्या १२ मेल आयडी खालील पत्त्यावर पाठवा.***

✉

*esahity@gmail.com*

*akshar.ankurmk@gmail.com*

खात्री बाळगा या मेल आयडीचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केला जाणार नाही. जाहिराती अथवा भलभलत्या मेल पाठवून त्रास देणार नाही. याचा उपयोग केवळ चांगले मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.

***:अधिक माहितीसाठी :***

***संकेत स्थळ***

**www.esahity.com**

**फेसबुक**

**https://www.facebook.com/esahity**

**http://www.facebook.com/groups/kavya.marathi**